

# जागतिकीकरण आणि लोकसाहित्य

संपादक

प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ

प्रा. डॉ. दिलीप भिसे





# जागतिकीकरण आणि लोकसाहित्य

संपादक

प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ    प्रा. डॉ. दिलीप भिसे

समीक्षा पब्लिकेशन

**प्रकाशन क्रमांक - ३८२**

---

जागतिकीकरण आणि लोकसाहित्य

**संपादक : प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ । प्रा. डॉ. दिलीप भिसे**

---

**© प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ**
अंबाजोगाई

---

**प्रकाशन – समीक्षा पब्लिकेशन, पंढरपूर.**

---

**प्रकाशक :** श्री. प्रविण अनिलराव भाकरे,
शंकर-पार्वती निवास, ढोले गल्ली, रांझणी,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर - ४१३ ३०४
मो. ९६८९१४१२०१ / ८६०५५१२७४२

---

**मुद्रक :** एक्सेल प्रिंटर्स, पुणे

---

**मुखपृष्ठ :** सरदार जाधव

---

**प्रथमावृत्ती :** १६ नोव्हेंबर २०२२

---

**अक्षरजुळणी :** समीक्षा टाईपसेटर्स, पंढरपूर.

---

**ISBN :** ९७८-९३-९५७०२-४२-३

---

**मूल्य :** ३००/- रु.

**समीक्षा पब्लिकेशनची सर्व पुस्तके bookganga.com या संकेतस्थळावर ऑनलाईन खरेदीसाठी उपलब्ध आहेत.**

# अनुक्रमणिका


१. लोकसाहित्यातील समाजजीवन एक अभ्यास । ११
– प्रा. डॉ. सिंधू सोलापूरे

२. लोकसाहित्याची भाषा : संशोधकांपुढील आव्हाने । १७
– डॉ. सुनीता उग्रस्कर

३. लोकसाहित्याची समीक्षा । २५
– डॉ. नवनाथ नारायणराव गोरे

४. लोकसाहित्यातील विनोद । ३१
– प्रा. डॉ. अर्चना चव्हाण

५. लोकसाहित्यातील लोककलाविष्कार । ३६
– प्रा. तुषार ज्ञानेश्वर पाटील

६. आदिवासी लोकसाहित्यातून व्यक्त होणारा निसर्ग । ४५
– प्रा. डॉ. र. तु. देशमुख

७. लोकसाहित्य आणि अन्य ज्ञानशाखा : परस्परसंबंध । ५०
– प्रा. एस. के. परदेशी

८. लोकसाहित्याच्या अध्ययनाचे महत्त्व । ५५
– डॉ. खाडप संजय बाबुराव

९. 'नव्वदोत्तरी मराठी कादंबरीतून प्रकटलेल्या लोकसाहित्यिक घटकांचा आविष्कार' । ६१
– श्री. सुनील अंबादास आहिरे, डॉ. किरण नामदेव पिंगळे

१०. लोकसाहित्य : संकल्पना व स्वरूप । ६९
– प्रा. अंगद श्रीपती भुरे

११. लोकसाहित्य, उगम अर्थ व स्वरूप । ७५
– प्रा. लक्ष्मण वसंत भागवत

१२. लोकनाट्य : स्वरूप व परंपरा । ८०
– प्रा. सीता लक्ष्मण केंद्रे

१३. लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्व । ८४
– डॉ. योगेश शेळके

# लोकसाहित्याची भाषा : संशोधकांपुढील आव्हाने

**डॉ. सुनीता उम्रस्कर**
शणै गोयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा
मराठी अध्ययन शाखा
गोवा विद्यापीठ, ताळगाव पठार गोवा

लोकसाहित्य हे मानवी जीवनाचे व संस्कृतीचे एक अविभाज्य अंग आहे. लोकसाहित्य हे नव्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या या युगामध्ये प्राचीन परंपरेचे संवर्धन करणारे आहे. मानवी जीवनाचा तो एक अविभाज्य घटक आहे. लोकसाहित्य हा एक मौखिक आविष्कार आहे आणि तो कथा, गीते, नाट्य, विधी याने परिपूर्ण आहे. मानवी जीवन आज कितीही तंत्रज्ञानाने परिपूर्ण होत असले तरी मानवी मनाचा तळ हा लोकसाहित्याचा आहे. कथा कथन करणे ही मानवी मनाची सुप्त इच्छा आहे तसेच गीतातील नादमयता, ताल, नृत्य ह्या सर्व मानसिक व शारीरिक संवेदनेशी तादात्म्य पावणाऱ्या आहेत.

लोकसाहित्याचा अभ्यास व संशोधन करणारे डॉ. रा. चिं. ढेरे, प्रभाकर मांडे, डॉ. गंगाधर मोरजे, डॉ. तारा भवाळकर, डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे या सगळ्या अभ्यासकांचे व संशोधकाचे कार्य मौलिक स्वरूपाचे आहे. लोकसाहित्यामधील अनुभव हा वैचारिकतेबरोबर सामाजिक स्तरावरचा असतो, तसाच तो भाषिकही असतो. लोकसाहित्यामध्ये लोकसमूहाच्या परंपरा, श्रद्धा इत्यादी सामाजिक घटकांचा जसा अभ्यास करता येतो तसाच या लोकसमूहाच्या भाषेचाही अभ्यास लोकसाहित्याद्वारे करता येतो.

लोकसाहित्यातील लोक व साहित्य या संज्ञेचा संबंध भाषेशी असतो. साहित्य व भाषा ह्या स्वातंत्र्य अभ्यासशाखा असल्या तरी या दोन्हीही शाखेशी 'शब्द' किंवा 'वाङ्मय' याचा संबंध असतो. किंबहुना ते त्याचे मूलद्रव्य असते. साहित्याच्या मुळाशी भाषा असते. वाणीने युक्त असलेल्या या भाषेतूनच लोकसाहित्याची निर्मिती होते. लोकसाहित्य हा समुहमनाचा आविष्कार आहे आणि तो सांस्कृतिक व सामाजिक परिघाने बांधलेला आहे. ती सामूहिक निर्मिती असल्याने त्या भाषेतून भौगोलिक, सांस्कृतिक परंपरेचे परिशीलन करता येते.

लोकसाहित्य हे मूलतः लोकवाङ्मय असल्याने त्याचे स्वरूप हे मौखिक असते.

लोकसाहित्याच्या अभ्यासक हे मौखिक वाङ्मय अक्षर करून त्यावर संशोधन करीत असतो. या लोकवाङ्मयाचे जतन करण्यासाठी ते लिखित स्वरुपात, मुद्रित स्वरुपात, ध्वनिफीत स्वरुपात किंवा चित्रफित स्वरुपात त्याचे रुपांतर केले जाते. आधुनिक तंत्रज्ञानामुळे लोकसाहित्याचे मौखिक रूपाचे जतन करणे त्याला अक्षरनिष्ठ बनविणे शक्य झाले आहे. एखाद्या लोकसाहित्यातील मौखिक आविष्कार शब्दरूप बनवून त्याचे लेखन करीत असताना ती 'ग्रांथिक' भाषेत न लिहिता ती जशी सांगितली जाते त्याच भाषेत ती लिहिली तर त्यातील सौंदर्य काहीप्रमाणात टिकून राहण्याची शक्यता असते.

लोकसाहित्य हे केवळ भूतकालीन संचितांचे संकलन नसून लोकसाहित्य हा वर्तमान आहे, जो परंपरेला धरून आहे व भाषा अवशेष हे त्याचे साधन आहे. पारंपरिक व्याकरण व ऐतिहासिक भाषाशास्त्र हे लिखित भाषेलाच प्रमाण मानत होते. मानववंश भाषविज्ञानातील सामाजिक भाषाविज्ञान ही एक शाखा आहे. त्यामध्ये त्या समाजाच्या संस्कृतीवरून मानवी संस्कृतीचे आकलन करण्याचा प्रयत्न होतो. फेरदीना द सोस्यूर यांच्या मते भाषा ही परिवर्तनशील असली तरी कोणत्याही एका कालखंडात ती अचल, स्थिर असते. त्यामुळे तिच्या एककालिक भाषिक स्थितीचे विश्लेषण भाषाविज्ञानामध्ये महत्त्वाचे ठरते. सोस्यूरने भाषिक वर्तन किंवा बोलणे हे व्यक्ती व्यक्तीनुसार बदलणारे असते म्हणजे व्यक्तिविशिष्ट असते उलट भाषिक व्यवस्था किंवा भाषा ही सामाजिक व एकजिनसी स्वरूपाची असते असे म्हटले आहे. लबव या भाषाभ्यासकाने सामाजिक भाषाविज्ञान हेच खऱ्या अर्थाने भाषाविज्ञान असे म्हटले आहे.

मानववंशविज्ञान आणि भाषाविज्ञान यांच्या अभ्यासातून मानवी संस्कृतीविषयीचे निष्कर्ष काढण्याचे पहिले श्रेय फ्रान्झ बोअस यांच्याकडे जाते. सपीर, वोर्फ मॅलिनोवस्की यांच्यासारख्या भाषावैज्ञानिकाने व मानववंश विज्ञानाच्या अभ्यासकांनी भाषाविचारामध्ये भाषेच्या जडणघडणीला महत्त्वपूर्ण स्थान दिले.

पारंपरिक धारणा अशी होती की आपल्या अनुभवांचा व विचारांचा प्रभाव भाषेवर पडत असतो; परंतु सपीर आणि बेंजामिन वोर्फ या मानववंशविज्ञानाचा अभ्यास केलेल्या भाषाभ्यासाचे म्हणणे नेमके उलट होते. त्यांनी असा सिद्धांत मांडला की आपल्या भाषेत उपलब्ध असणाऱ्या कोटींच्याच साहाय्याने आपण अनुभव घेऊ शकतो व विचार करू शकतो; त्यामुळे भाषेचा प्रभाव अनुभववादावर व विचारावर पडतो. सपीर आणि वोर्फ यांचा हा सिद्धांत 'भाषिक सापेक्षतावाद' म्हणून ओळखला जातो.

लोकसाहित्याचा भाषिक अभ्यास करताना भाषाभ्यासकाला अनेक घटकांचा विचार करावा लागतो.

**वर्णविचार –** वर्णविचारामध्ये त्या बोलीभाषेतील वर्णव्यवस्थेचे आकलन करून

कोणते वर्ण त्या बोलीभाषेत आहेत हे पाहावे लागते. उदा. काही बोलीभाषेत फ चा उच्चार ख असा होतो. उच्चारणातील आघात, कठोरवर्ण, मृदुवर्ण याचा तपास करावा लागतो.

शब्दविचार – यामध्ये शब्दाच्या उच्चारणातील लयबद्धता पाहावी लागते. तसेच भाषेचे सामर्थ्य पाहत असताना भाषिक संपदा लक्षात घ्यावी लागते.

**लोकसाहित्याच्या भाषासंशोधकांपुढे असलेली आव्हाने :**

१. लोकसाहित्य हे प्रामुख्याने दृश्य व श्राव्य स्वरूपात असते. त्यामुळे संशोधक हा उत्तम श्रोता असणे आवश्यक आहे. लोकसाहित्याच्या भाषेचे स्वरूप हे मौखिक असल्याने त्याच्या भाषणातील ध्वनी लिपिबद्ध करीत असताना तो उत्तम श्रोता असावा लागतो. मौखिक स्वरूपात असलेल्या या साहित्याला अक्षरवाङ्मय बनवणे हे संशोधकापुढे असलेले एक आव्हान आहे.

२. त्या विशिष्ट क्षेत्रीय भाषेमध्ये एखाद्या अपरिचित ध्वनी किंवा अतिरिक्त ध्वनीची जोड मिळालेली आहे की नाही हे तपासताना त्या क्षेत्रीय भाषेची ध्वनीरूपे प्रथमतः आत्मसात करावी लागते.

उदा. मराठी भाषेतील बोलीमध्ये दंत्य घर्षस्फोटके
कोकणी भाषेतील नासिक्य ध्वनी
लिंगपद्धतीमध्ये असलेला बदल

उदा. मराठी भाषेतले ती (स्त्री) तो (पुरुष)
कोकणी भाषेत ती (स्त्री) तो (पुरुष) तर तें (मुलगी)

२. अनुनासिकतत्वाचा विचार करणे महत्त्वाचे ठरते. त्यातून एखाद्या विशिष्ट प्रदेशामध्ये बोलल्या जाणाऱ्या भाषेचे स्वरूप तपासात येते. त्याचबरोबर एखाद्या विशिष्ट समाजाचे, जातीचे, लिंगभेदाचे, वयाचे सूचन करणारे शब्द पाहता येतात.

लोकसाहित्य हे मौखिक असले तरी त्याचे लिप्यंकन करणे महत्त्वाचे ठरते. येथे गोमंतकीय लोकसाहित्याचे अभ्यासक विनायक खेडेकर म्हणतात त्याप्रमाणे लोकगीतांची नोंद करीत असताना त्यांचे मूळ उच्चार बदलण्यात आलेले नाहीत. अपभ्रंश जाणवत असला तरी शब्दांचे नागरीकरण करण्याचा प्रयत्न येथे केला नाही. तर ती त्या त्या लोकभाषेत उच्चारणानुसार ठेवण्यात आली आहेत. लोकभाषा दर बारा कोसावर बदलत असते, असे मानले जाते. शब्दांचे अर्थ, उच्चारण पद्धती, आघात यामध्ये हा बदल दिसतो. म्हणून गीतांचे स्वरूप जाणून घेताना त्या जातीजमातीचे अथवा विभागाचे मूळ शब्द, अक्षरे कायम ठेवणे येथे योग्य वाटते.[१] पुढे त्यानी एका लोकगीतांचे लीप्यंकन करीत असताना त्यामध्ये निम्बानी, निंबू, निबना असे शब्द तर पुढे त्याच गीतामध्ये लिंबू

असा शब्दप्रयोग येताना दिसतो.

'लिंबू धाडाया पांढरे देसा' सौंदर्यभावना, नीतितत्त्वे, तत्त्वज्ञान आणि भाषा या चार समान तत्त्वांच्या ओढीतून सहजपणे तो एकत्र आलेला जनसमूह असतो.[२]

**लोकसाहित्याच्या संशोधकापुढील आव्हाने :**

१. गाण्यातील विशिष्ट पद्धतीतील स्वरांचे बारकावे, हेलकावे, आघात दाखविणे अतिशय आव्हानात्मक ठरते.

२. लोकसाहित्य हा समाजमनाचा आविष्कार असल्याने भाषासंशोधकाने अलिप्तपणे राहून ती भाषिक सामग्री गोळा करणे आवश्यक ठरते. लोकमानसाच्या श्रद्धा व जीवन समजून घेणे हे संशोधकाला आव्हानात्मक ठरते.

३. लोकसाहित्याचे लिप्यंकन करीत असताना काही नियम पाळणे उदा. अर्ध्या व्यंजनासाठी हलन्तचा उपयोग करणे, दंत्य व तालव्य घर्षस्फोटकातील भेद दर्शविणे, नासिक्यरंजन दर्शविण्यासाठी त्यांच्या शिरोभागी बिंदुयुक्त ऊर्ध्वमुखी अर्धेन्दू चिन्ह देणे उदा. संवशय इत्यादी

'लोकसाहित्याच्या भाषेचा अभ्यास करीत असताना सामान्यतः त्या भाषेतील बोलीतील स्वनिमांची निश्चिती करावी लागते.'[३] मौखिक स्वरूपात असलेल्या या शब्दांना लिपिबद्ध करून त्या शब्दाच्या निर्मितीप्रक्रियेचा अन्वयार्थ लावणे महत्त्वाचे ठरते.

लोकसाहित्याचा भाषिक अभ्यास करताना लोकसाहित्यातील ध्वनी हा विशेष मनाला जातो.

उदा. स्वयंपाक चे सैंपाक होणे, ओळख चे वळख होणे

विनायक खेडेकरांच्या 'लोकसरीता' या ग्रंथामधील काही उदाहरणे ४

शीता (सीता ), लक्षुमना (लक्ष्मण ), जानके (जानकी, मिर्ग (मृग ), कुर (क्रौर्य), धनुसबाण (धनुष्यबाण), खागा (खा हा धातू तर गा हे संबोधन आहे.), विदवास (विध्वंस ), इसराम (विश्राम) यातून प्रमाण बोली व ग्रामीण बोलीमधला परस्परसंबंध दाखविता येतो.

विशिष्ट ध्वनिवैशिष्ट्ये ही विशिष्ट भाषिक खंडातील असतात. हे बदल अनौपचारिक किंवा बोलण्यात सैलपणा आणण्यासाठी असतात किंवा एखाद्या स्त्रीवैशिष्ट्य दाखविण्यासाठी किंवा विनोदी बाज निर्माण करण्यासाठी येतात.

बदल होणे हे आवश्यक आहे त्याचप्रकारे परंपरेचे जतन करीत असताना ते अधिक डोळसपणे व गतिमानतेने होण्याची गरज आहे. जागातिकिकरणाचा प्रभाव आज भाषेवर झालेला दिसतो. त्याचा परिणाम म्हणजे आज मूळ भाषा न बोलता

प्रसारमाध्यमांचीच भाषा ते बोलताना दिसतात. प्राचीन काळी 'लोकेषु वेदेषु' या पदातून वैदिक संस्कृतीपेक्षा भिन्न जीवन जगणारे ते लोक हा अर्थ स्पष्ट होता''[५]

प्रत्येक पिढीत भाषा वेगवेगळी रूपे धारण करीत असते. त्याची उच्चार रूपे, शब्दसंग्रह, त्यातील वाक्प्रचार हे वेगवेगळ्या अंगानी एक नवा साज लेवून अवतरते. भाषा परिवर्तनशील असल्यामुळे भाषेच्या बाबतीत ती एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. यामागची कारणे अशी की –

१. संस्कृतीबद्दल

२. परकीय राजवटीची भाषा

३. नवीन तंत्रज्ञान व नवीन विचारधारा

एखाद्या भाषेतील बोलीत शब्द हा वेगवेगळ्या अर्थघटकांनी युक्त असतो. उदा. 'कितली म्हारगाय गे सायबिणी' ही फुगडी कित्येक वर्षे म्हटली जाते. ही महागाई त्यावेळीही होती आजही आहे. त्यामध्ये आलेला 'सायबिणी' हा शब्द पोर्तुगीजांच्या प्रभावातून आलेला दिसतो. लिखित स्वरूपात उपलब्ध असलेल्या सतराव्या शतकांतील ख्रिस्ती वाङ्मयात कुठेही सायबा व सायबीण हा शब्द सापडत नाही. तेथे तो स्वामी वा स्वामिणी असा आलेला आहे. गोव्यामध्ये बोलण्याच्या ओघात येणारा हा शब्द आहे. उदा. हाय सायबा, सायबा भोगोस इत्यादी.

भाषा ही परिवर्तनशील असते. ती बोली असो व प्रमाण भाषा असो. बदल होणे हे त्याचे नैसर्गिक वैशिष्ट्य आहे कोणत्याही भाषेचा विचार केला तर त्याची पूर्वावस्था ही मौखिक असते. ती ध्वनीची बनलेली असते. यालाच भाषावैज्ञानिक दृष्टीने स्वन असे म्हणतात. लोकसाहित्य हा मौखिक आविष्कार आहे. संस्कृती ही माणसाच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. संस्कृती हे लोकसाहित्याचे मूलद्रव्य आहे. भाषा हा संस्कृतीचा एक घटक आहे. भाषा ही ध्वनी, शब्द, वाक्य याची बनलेली असते. त्यामुळे भाषेतील ध्वनींचा, शब्दांचा व वाक्यांचा विचार भाषाविज्ञानामध्ये केला जातो. भाषेमध्ये शुद्ध-अशुद्धता असते अशासारखी विधाने आज मागे पडलेली आहेत. ज्या भाषेमध्ये एखाद्या विशिष्ट लोकसमूहाचा व्यवहार सुरळीतपणे चालत असेल तर ती भाषा अशुद्ध ठरण्याचे कारणच नाही. सोस्यूरने बोलीचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या मते भाषा ही एक ध्वनीचिन्हव्यवस्था आहे. प्रत्येक लिखित भाषा ही आरंभी मौखिकच असते. संप्रेषणसक्षम असलेली भाषा ही मुळातच शुद्ध असते. भाषा ही मौखिकच असते.

लिपी हे तिला मिळालेले माध्यम आहे. लोकसाहित्याला अधिक वास्तवलक्ष्यी बनवायचे असेल तर त्याचा विचार समाजभाषाविज्ञानाच्या अनुषंगाने करता येईल. भाषा ही परिवर्तनशील असली तरी ती एका काळामध्ये स्थिर असते. त्याचा भाषावैज्ञानिक

पद्धतीने अभ्यास व्हायचा असेल तर त्याचे लीप्यंकन शास्त्रशुद्ध पद्धतीने होणे आवश्यक आहे. भाषेतील ध्वनी व शब्द हा हा सांस्कृतिक ऐवज आहे. त्याचे जतन करून संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.

लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व आज जागतिक स्तरावर सर्वमान्य झाले आहे. लोकसाहित्य हे भाषाशास्त्र, भाषाविज्ञान, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास, पुरातत्त्वविद्या, वैद्यकशास्त्र अशा ज्ञानशाखांना सामग्री पुरविणारे अभ्यासक्षेत्र म्हणून आज अनेक अभ्यासकांनी व संशोधकांनी सिद्ध करून दाखविले आहे.

आजचे लोकसाहित्य हे निरक्षर व साक्षर यामधला दुवा आहे. लोकसाहित्य हे लोकजीवनाचे अंतरंग आहे. लोकसाहित्याचा अभ्यास हा लोकसंस्कृतीच्या अभ्यासाला व्यापक परिमाण प्राप्त करून देणारा आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासाकडे संशोधक आणि अभ्यासकांना अजूनही आव्हान म्हणूनच पाहावे लागेल. लोकसाहित्य, लोककला, लोकित्सव यांच्या जतन व संवर्धनाबरोबरच ही लोककला इतरत्र पोचविणे अत्यंत आवश्यक आहे.

लोकसाहित्य हे समाजसंस्कृतीचे द्योतक आहे. उत्स्फूर्त भावभावनांचा आविष्कार या लोकसाहित्यातून घडतो. त्यासाठी त्यांची एक बोलीभाषा असते. ही भाषा त्या माणसांच्या जिवंत अनुभवाचे एक साधन बनते. ह्या भाषेतून समूहमनातील भावभावनांचे पडसाद उमटतात म्हणून ती अस्सल वाटते.

लोकसाहित्य हे आदिम असले तरी नित्यनूतन आहे. अलिखित शब्दपरंपरेमध्ये झालेला बदल हा समाजाने स्वीकारलेला असतो. बदल होणे हे आवश्यक आहे त्याचप्रकारे परंपरेचे जतन करणे हे ही आवश्यक आहे. आवश्यकता आहे ती ही की ते अधिक डोळसपणे व गतिमानतेने होण्याची.

लोकसाहित्य हे मौखिक असल्याने ती सर्वप्रथम संहितानिष्ठ बनविणे हे भाषाभ्यासकांचे फार मोठे आव्हान ठरते. एखाद्या संहितेचे लेखन केलेले असेल तर संशोधकाला फक्त त्याच्यावर अवलंबून राहता येणे शक्य नाही. त्यावेळी त्याला संहिताशुद्धीचे कार्य करावे लागेल.

सगळ्या भाषा ह्या मुख्यतः बोलीच असतात व सर्व बोली या भाषा असतात. उदा. एखाद्याची बोली समजते असे न म्हणता आपण भाषा समजते असेच म्हणतो. ती बोली हे एक मौखिक रूप आहे. ती ध्वनिरूप असते. त्याच ध्वनीच्या लिखित रुपाला आपण लिपीरूप किंवा लिपिबद्ध भाषा असे म्हणतो.

नागरी जीवनाची ओढ व बदलती सामाजिक मूल्ये याचा आजच्या जीवनावर परिणाम होत आहे. भाषेवर त्याचा परिणाम होणे अपरिहार्य आहे. त्यामुळे या भाषांचे

संकलन, संशोधन करून त्याचे जतन करणे ही आजची निकड आहे. लोकसाहित्याच्या भाषेचा अभ्यास हा विगमनात्मक प्रक्रियेवर आधारलेला असतो. लोकसाहित्याचे संकलन करणे व त्याचे विश्लेषण संश्लेषण करून भाषिक अभ्यास करणे हे प्रमुख टप्पे आहेत.

भारतीय संस्कृती म्हणजे वैदिक संस्कृती किंवा आर्य संस्कृती असे आपण सर्वच मानतो, पण त्याही आधी भारतवर्षात एक संस्कृती नांदत होती हे विसाव्या शतकाच्या प्रारंभी झालेल्या उत्खननाने सिद्ध झालेले आहे. त्यामुळे या संस्कृतीची मुळे शोधण्यासाठी फार खोलवर तपास करावा लागेल.

वेद वाङ्मयातील इंद्र, वरुण, अग्नी या देवतांपेक्षा खेतोबा, खन्डोबा, वेतोबा, मरीआई, रवळनाथ, सातेरी, भूमिका अशा ग्रामदेवदेवता आलेल्या दिसतात. साडेतीनशे वर्षेपर्यंत इंग्रजांच्या अमदानीत असलेला भारत व साडेचारशे वर्षे पोर्तुगीजांच्या अमदानीत असलेले गोवा राज्य या परकीय सत्तेला न जुमानता आपल्या लोकसंस्कृतीचे जडे इतकी घट्ट रोवून उभा होता की आजतागायत ह्या लोकसंस्कृतीला खंड पडला नाही. त्याचेच प्रतिबिंब आज आपल्याला पाहावयास मिळते. समाजाचा हा समृद्ध वारसा आजही लोकसमुदायाने जपलेला आहे.

वास्तविक पाहता सर्व समाजातील सांस्कृतिक अंतःप्रवाहामध्ये साम्यता दिसते. निसर्ग व मानव या सगळ्यांच्या मुळाशी असलेला दिसतो. माणसाच्या अंतःप्रेरणेतून निर्माण झालेल्या भावभावना म्हणजे भीती व आनंद.

आपल्याभोवती असलेली पंचमहाभूते व त्याच्या ऋणाची फेड करण्याची भावनेतून निर्माण झालेली ही लोकसंस्कृती आहे. आणि या संस्कृतीला लाभलेली अमूल्य जोड म्हणजे लोकसाहित्य. संस्कृतीतील विविध अविष्कारांना व्यापणारे ते लोकसाहित्य. संस्कृती ही व्यक्तिसापेक्ष नसून समाजसापेक्ष आहे. समूहमनाच्या उत्स्फूर्त भावभावनांच्या आविष्काराचे ते द्योतक आहे.

लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व आज जागतिक स्तरावर सर्वमान्य झाले आहे. लोकसाहित्य हे भाषाशास्त्र, भाषाविज्ञान, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास, पुरातत्त्वविद्या, वैद्यकशास्त्र अशा ज्ञानशाखांना सामग्री पुरविणारे अभ्यासक्षेत्र म्हणून आज अनेक अभ्यासकांनी व संशोधकांनी सिद्ध करून दाखविले आहे.

आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानयुगात जीवनसंदर्भ बदलले आहेत, बदलत आहेत. लोकसाहित्य हे आज शिक्षित लोकांचे साहित्य म्हणून पाहिले जात आहे. लोकसाहित्य हे कालबाह्य न ठरता लोकसहित्याद्वारे परंपरेचे जतन करणे महत्त्वाचे ठरते. जागतिकीकरणाच्या आजच्या काळात लोकसाहित्य कला, भाषा व संस्कृती याचा

झपाटयाने ऱ्हास होत आहे. अतिशय समृद्ध असलेल्या या लोकसाहित्याचे जतन करणे सर्वांचे परमकर्तव्य आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

१. खेडेकर विनायक, लोकसरिता: गोमंतकीय जनजीवनाचा समग्र अभ्यास, गोवा कला अकादमी, गोवा पृ. १८१
२. तत्रैव, पृ. २६२
३. आधुनिक भाषाविज्ञान (संरचनावादी आणि सामान्य ) संपा. कल्याण काळे/ अंजली सोमण, लेख-सु. बा. कुळकर्णी, प्रतिमा प्रकाशन, पुणे. १९९९, पृ. २२८
४. उ. नि., लोकसरिता: गोमंतकीय जनजीवनाचा समग्र अभ्यास, पृ. २८०
५. संपा. वसंत जोशी, गं. ना. जोगळेकर , भाषा व साहित्य : संशोधन (खंड दुसरा), महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८५ पृ. २६२



प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ



डॉ. दिलीप ज्ञानोबा भिसे

आजच्या आधुनिक युगात भरमसाठ साधने घरपोच असतानाही आजची कितीतरी मंडळी या लोकसाहित्याकडे, लोकसंगीताकडे, लोकनृत्याकडे, लोकनाट्याकडे वळलेली दिसते. या सर्व कला अभ्यासणे व त्यात कालानुरूप भर घालणे, ही क्रिया या पिढीकडून कमीअधिक होत आहे. गुजरातमधील गरबा संपूर्ण देशभर लोकप्रिय होत आहे, जगभरात विविध हेतुस्तव संक्रमित झालेली भारतीय मंडळी भारतीय लोककला, संगीत, गणेशउत्सव, मृदंगाचा नाद, लावणीचा ठेका चारीदिशात प्रसारित करण्याचे कार्य करीत आहेत, हे लोकसाहित्याच्या बाजूने महत्त्वपूर्ण पाऊल आहे, असे म्हणता येईल. जागतिकीकरणातून निर्माण झालेल्या यंत्र, साधन सामुग्रीद्वारे पिढ्यानपिढ्या चालत आलेले लोकसाहित्य कायमस्वरूपी चित्रित, मुद्रित, संकलित होत आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात याचा प्रसार सहजतेने होत आहे. लोकांच्यापर्यंत हे साहित्य सहजगत्या पोहोचत आहे. लोकांकडून लोकांकडे या सूत्रानुसार आजवर हे लोकसाहित्य प्रवास करत होते; मात्र आता जागतिकीकरणामुळे हे लोकसाहित्य विविध प्रसारमाध्यमांद्वारे, यंत्रसामुग्रीद्वारे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे किंवा एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे सहजगत्या प्रसारित होत आहे. असा हा महत्त्वपूर्ण परिणाम जागतिकीकरणामुळे झाला, हे नाकारता येणार नाही...

डॉ. शिवदास शिरसाठ
डॉ. दिलीप ज्ञानोबा भिसे

मूल्य : ३००/-
ISBN : 978-93-95702-42-3
9 789395 702423